

# पावसाळी संगीत जलसा





ब्रिन्दा दत्ता

संजय सरकार



# पावसाळी संगीत जलसा

लेखन

**ब्रिन्दा दत्ता**

चित्रांकन

**संजय सरकार**

मराठी अनुवाद


**डॉ. उत्कर्षा मनिष**

8743

बंगाल मधल्या छोट्या गावातल्या एका मोठ्या डबक्यात बेंगो नावाचा बेडूक राहत असे. बेंगोला उड्या मारायला आणि पोहायला फार आवडे.
पण त्याला सर्वात अधिक पाऊस आवडे.





त्याला पावसाचा स्पर्श आवडे, आवाज आवडे आणि सुगंध आवडे. पावसाच्या विचाराने त्याच्या चेहऱ्यावर हास्य फुले. त्याने स्वत:लाच विचारले, 'पाऊस मला आनंद देतो हे मी कसे बरं सांगावे?'



नंतर एके दिवशी गरमीच्या दिवसात तो पावसाचे स्वप्न पाहत असताना त्याला याचे उत्तर मिळाले. तो एवढ्या जोराने गाणं म्हणेल की आभाळाला सुद्धा ते ऐकू येईल. म्हणून प्रत्येक रात्री त्याने सराव करायला सुरुवात केली. "डराव डराव डराव डराव." लवकरच सगळ्यांना कळले बेंगो का गाणे म्हणत आहे.

"काय सुंदर कल्पना आहे!" घूं घूं घुबड म्हणाले. "चला आपणही त्याच्या गाण्याला संगीत देऊ," किर किर रातकीडा आणि चक चक पाल म्हणाली. म्हणून त्यांनी बेंगोला गायला सांगितले आणि संगीत दिले. आणि ते असे होते...





डराव डराव
डराव डराव
हूं-हूं घू-घूं हूं-हूं घूं
डराव डराव डराव डराव
किर-किर टीर-टीर हूं-हूं घूं
डराव डराव डराव डराव
चक-चक चक-चक
हूं-हूं घूं

दूर काजव्याने हे संगीत ऐकले आणि तो त्याच्या दिशेने उडाला, तालात, ठेक्यावर, वर आणि खाली... खाली आल्यावर ढगांतून पावसाला हा सुखद धक्का होता! त्याने हे संगीत ऐकले. ''मला ही गाणं म्हणायला आवडेल,'' तो म्हणाला. ''सामील हो, सामील हो,'' सर्व संगीतकार म्हणाले. आता तयार झालेले गाणं असे होते.



टप-टप टप-टप टप-टपक
डराव डराव डराव डराव
किर-किर टीर-टीर टप-टपक
डराव डराव डराव डराव
घूं-घूं टपक, टपक-घूं
किर-किर टीर-टीर
टपक-घूं
डराव डराव
चक-चक-चक
डराव डराव
घूं-घूं-घूं

8743





आणि अशा प्रकारे पावसाळ्यातल्या संगीत जलसा तयार झाला. पावसाळ्यात हे संगीत जरुर ऐका. आणि तुम्हालाही सामील व्हायचे असेल तर व्हा आणि गा.....डराव डराव टप-टपक!



माझं नाव सतीश आहे. मी मस्तीखोर आहे असं सर्व म्हणतात. पण ते मला कधीच शिक्षा देत नाहीत कारण मी वर्गात पहिला येतो. मी प्रथमच्या वाचनालयातली पुस्तके वाचतो म्हणून मी वर्गात पहिला येतो असं शिक्षक म्हणतात.

तुम्ही हे पुस्तक विकत घेतल्याबद्दल मी तुमचा आभारी आहे. यामुळे माझ्या वाचनालयाला माझ्यासाठी आणि माझ्या मित्रमैत्रिणींसाठी नवीन पुस्तके घेता येतील.

**ब्रिन्दा दत्ता** या निवृत्त शिक्षिका आहेत. त्या इंग्रजी विषय शिकवत असत. त्यांना लहान मुलांसाठी काम करायला आवडते. त्या गोष्टी सांगण्यात आणि नाटूकली करण्यात रमतात. त्यांना पुस्तके वाचायला, गाणि ऐकायला तर आवडतेच शिवाय त्यांना कुत्रे आणि मांजरीही आवडतात!

**संजय सरकार** रवींद्र विश्वविद्यालयाचे नवोदित चित्रकार आहेत. त्यांची चित्रे आनंद बाजार पत्रिका, द स्टेटस्मॅन, ऑक्सफर्ड युनिवर्सिटी प्रेस, नॅशनल बूक ट्रस्ट आणि स्कोलास्टिक प्रकाशनात पाहायला मिळतात.

पावसाळ्यातील आवाज तुम्हाला संगीत निर्मितीला उत्तेजित करतो का? पावसाळा सुरू झाल्यावर बेंगो बेडूक, घूं घूं घुबड आणि किर किर रातकिडा सुंदर जलसा करतात!

आमच्या वेगवेगळ्या भाषेतील शीर्षकांच्या माहितीसाठी
www.prathambooks.org ला लॉगऑन करा

**प्रथम बुक्स** ना-नफा प्रकाशक आहेत जे उत्तम दर्जाची आणि स्वस्त दरात भारतातील विविध भाषेत लहान मुलांसाठी पुस्तके काढतात.

ISBN 978-81-8263-802-0

Age Group : 3-6 years
Paavsaalee Sangeet Jalsaa (Marathi)
MRP: Rs. 20.00